**तहसिलदार संवर्गातून उप जिल्हाधिकारी संवर्गात तदर्थ पदोन्नती देण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**

महसूल व वन विभाग

शासन आदेश, क्र.पदोन्न-०३२२/प्र.क्र.२६/ई-२

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,

मंत्रालय, मुंबई ४०००३२.

दिनांक:- २० एप्रिल, २०२३.

**संदर्भ:-**

१. शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग, क्र.सेवाज्ये-१३१९/प्र.क्र.१०३/ई-३, दि.१२.०६.२०१९.
२. शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग, क्र.सेवाज्ये-१३२२/प्र.क्र.२८६/ई-३, दि.०६.०१.२०२३.
३. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/कार्यासन १२, दि.०१.०८.२०१९.
४. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.३१०/कार्या.१२, दि.१५.१२.२०१७.
५. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दि.०७.०५.२०२१.
६. शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-२०२०/प्र.क्र.४९/कार्या.१२, दि.१४.०७.२०२१.

**शासन आदेश:-**

शासन परिपत्रक, दि.१२.०६.२०१९ अन्वये तहसिलदार संवर्गातील अधिका-यांची दि.०१.०१.२००४ ते दि.३१.१२.२०१० या कालावधीची अंतिम ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे. तसेच शासन परिपत्रक, दि.०६.०१.२०२३ अन्वये तहसिलदार संवर्गातील अधिका-यांची दि.०१.०१.२०११ ते दि.३१.१२.२०१२ या कालावधीची तात्पुरती ज्येष्ठतासूची प्रसिद्ध करण्यात आली आहे. सदर ज्येष्ठतासूचीच्या आधारे निवडसूची वर्ष २०२२-२३ मध्ये सरळसेवा कोट्यातील रिक्त पदांवर व सेवानिवृत्तीमुळे रिक्त होणा-या पदांवर तहसिलदार (गट-अ) (एस-१९:रू.५५,१००-१,७५,१००) संवर्गातील अधिकाऱ्यांना उप जिल्हाधिकारी (गट-अ) (एस-२०:रू.५६,१००-१,७७,५००) संवर्गात तदर्थ पदोन्नती देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. तथापि, उक्त नमूद ज्येष्ठतासूची ही तहसिलदार संवर्गाच्या नियमितीकरणाच्या अधिन आहे. सदर नियमितीकरणाच्या प्रक्रियेत अव्वल कारकून/ मंडळ अधिकारी या संवर्गापासून सर्व पदोन्नत झालेल्या महसूल संवर्गातील अधिका-यांचा समावेश आहे. सदर ज्येष्ठतासूचीसंदर्भात मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे दाखल असलेल्या मूळ अर्ज क्र.३३९/२०२० मधील अवमान याचिका क्र.६९/२०२२ (श्रीमती मनिषा मोहिते वि. महाराष्ट्र शासन व इतर) मध्ये मा. न्यायाधिकरणाने सदर नियमितीकरणाची प्रक्रिया विचारात घेऊन दि.२१.०२.२०२३ रोजी खालीलप्रमाणे आदेश पारित केलेले आहेत:-

"(2) The promotions in future, shall be subject to giving deemed date of promotion to the present applicants.

(3) We make it clear that if the juniors to the applicants are promoted and if after giving the deemed date of seniority whatever effect, it will be subject to the outcome of this C.A.

(4) The Respondent-State is directed to communicate this order to all the concerned officers whosoever is promoted. The promoted persons may be demoted after fixing the final seniority list based on the deemed date."

मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांनी वरीलप्रमाणे दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने महसूल विभागांतर्गत क्षेत्रिय स्तरावर उप जिल्हाधिकारी संवर्गातील रिक्त असलेल्या पदांमुळे प्रशासकीय कामकाजावर होणारा प्रतिकूल परिणाम टाळण्यासाठी पदोन्नतीने उप जिल्हाधिकारी संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबतचा निर्णय सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने घेण्यात आला आहे.

२. त्यानुषंगाने, खालील तक्त्यात दर्शविलेल्या तहसिलदार (गट-अ) (एस-१९:रू.५५,१००-१,७५,१००) संवर्गातील अधिकाऱ्यांना उप जिल्हाधिकारी (गट-अ) (एस-२०:रू.५६,१००-१,७७,५००) संवर्गात या आदेशात नमूद अटी/ शर्तीच्या अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात तदर्थ पदोन्नती देण्यात येत आहे.

| अ.क्र. | ज्ये. क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | प्रवर्ग | नियुक्ती |
|---|---|---|---|---|
| **शासन परिपत्रक, दि.१२.०६.२०१९ अन्वये प्रसिद्ध करण्यात आलेल्या ज्येष्ठतासूचीतील अधिकारी** | | | | |
| १. | ८८६ | श्री. राजीव विश्वनाथराव शिंदे | खुला | ससे |
| २. | ९६७ | श्री. अनिलकुमार ज्योतीराम भटकर | अ.जा. | पदो |
| ३. | ९६८ | श्री. बळवंत दयाराम अरखराव | अ.जा. | पदो |
| ४. | १०४८ | श्री. संदिप सुधाकरराव कुलकर्णी | खुला | पदो |
| ५. | १०५५ | श्री. राहूल विठ्ठलराव गायकवाड | अ.जा. | पदो |
| ६. | १०५८ | श्री. जीवराज ज्ञानोबा डापकर | भ.ज.(ड) | पदो |
| ७. | १०९३ | श्रीमती रुपाली रामचंद्र चौगुले | खुला | ससे |
| ८. | ११०५ | श्रीमती वैशाली बाळासाहेब पाटील | खुला | ससे |
| ९. | १११६ | श्री. वरुणकुमार सहारे | अ.जा. | ससे |
| १०. | ११३४ | श्रीमती कविता भिमसेन जाधव | वि.जा.(अ) | ससे |
| ११. | ११४४ | श्री. सुनिल दत्तात्रय शिंदे | खुला | पदो |
| १२. | ११५१ | श्री. प्रदिपकुमार लालसिंग पवार | वि.जा.(अ) | पदो |
| १३. | ११६६ | श्री. दिपक मच्छिंद्र वजाळे | अ.जा. | पदो |
| १४. | ११९२ | श्री. शिवकुमार मनोहर आवळकंठे | खुला | पदो |
| १५. | १२११ | श्री. शशिकांत बिभीषण गायकवाड | खुला | ससे |
| १६. | १२१२ | श्रीमती प्रियंका गजानन कांबळे | भ.ज.(ब) | ससे |
| १७. | १२१३ | श्री. आकाश सदाशिव लिगाडे | खुला | ससे |
| १८. | १२१६ | श्री. प्रमोद किसन हिले | अ.ज. | ससे |
| १९. | १२१८ | श्री. संजय निवृत्ती पाटील | इमाव | ससे |
| २०. | १२१९ | श्री. अनिल वसंत दौंडे | इमाव | ससे |
| २१. | १२२० | श्रीमती अर्चना बापुराव खेतमाळीस | इमाव | ससे |
| २२. | १२२२ | श्री. दिपक संतोष पाटील | इमाव | ससे |
| २३. | १२२३ | श्रीमती लिना एम. फलके | इमाव | ससे |
| २४. | १२२४ | श्री.महेश लक्ष्मण सागर | अ.जा. | ससे |
| २५. | १२२५ | श्री. दयालसिंग व्यंकुसिंग ठाकूर | वि.जा.(अ) | ससे |

| अ.क्र. | ज्ये. क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | प्रवर्ग | नियुक्ती |
|---|---|---|---|---|
| २६. | १२२६ | श्री. अभिजीत महादेव सावर्डे-पाटील | खुला-दिव्यांग | ससे |
| २७. | १२२७ | श्रीमती मंजुषा लटपटे | भ.ज.(ड) | पदो |
| २८. | १०६२ | श्रीमती अनिता भालेराव | भ.ज.(ब) | पदो |
| २९. | १२३१ | श्री. अतुल त्रिंबकराव जटाळे | खुला | पदो |
| ३०. | १२३५ | श्री. रुपेश लक्ष्मणराव शिंगारे | खुला | पदो |
| ३१. | १२३६ | श्री. महेश मुकुंदराव परंडेकर | खुला | पदो |
| ३२. | १०६६ | श्री. संतोष बब्रुवान गोरड | भ.ज.(क) | पदो |
| ३३. | १२३७ | श्री. गजेंद्र नरेंद्र पाटोळे | अ.जा. | पदो |
| ३४. | १२३९ | श्री. सुरेश वसंत थोरात | अ.जा. | पदो |
| ३५. | १२४० | श्रीमती अंजली प्रशांतसिंग मरोड | वि.जा.(अ) | पदो |
| ३६. | १२४३ | श्रीमती सुषमा अभय चौधरी | इमाव | पदो |
| ३७. | १२४४ | श्री. विवेक प्रल्हाद साळुंके | अ.ज. | पदो |
| ३८. | १२४४अ) | श्री. किरणकुमार काकडे | खुला | पदो |
| ३९. | १२४५ | श्री.रणजित पांडुरंग देसाई | खुला | पदो |
| ४०. | १२४६ | श्री. हनुमंत शिवाजी पाटील | खुला | पदो |
| ४१. | १२४७ | श्री. दिगंबर पोपट रौंधळ | इमाव | पदो |
| ४२. | १२४८ | श्री. शिवाजी जनार्दन शिंदे | खुला | पदो |
| ४३. | १२५३ | श्री. विवेक शाहुराजे जाधव | खुला | पदो |
| ४४. | १२५४ | श्री. विजय गणपत पाटील | खुला | पदो |
| ४५. | १२५५ | श्री. राजेंद्र रामचंद्र पोळ | खुला | पदो |
| ४६. | १२५६ | श्री. शरद वसंतराव पाटील | खुला | पदो |
| ४७. | १२५९ | श्री. प्रशांत सुरेश पिसाळ | खुला | पदो |
| ४८. | १२६० | श्री. दगडू सुखदेव कुंभार | इमाव | पदो |
| ४९. | १२६१ | श्री. किशोर वसंतराव घाडगे | खुला | पदो |
| ५०. | १२६२ | श्री. निलप्रसाद नागदेवराव चव्हाण | खुला | पदो |
| ५१. | १२६८ | श्री. विद्यासागर भिमराव चव्हाण | खुला | पदो |
| ५२. | १२६९ | श्री. गजेंद्र रामकृष्ण बालपांडे | इमाव | पदो |
| ५३. | ९९९ | श्री. रविंद्रकुमार गंगाराम माने | अ.जा. | पदो |
| ५४. | १२६९ अ) | श्री. दिपकराव शिवाजीराव कारंडे | अ.जा. | पदो |
| ५५. | १२७० | श्री. सचिन विलासज्योत गोसावी | भ.ज. (ब) | पदो |
| ५६. | १२७१ | श्री. संजय वामन पवार | अ.ज. | पदो |
| ५७. | १२७२ | श्री. अनिल जालू गावीत | अ.ज. | पदो |
| **शासन परिपत्रक, दि.०६.०१.२०२३ अन्वये प्रसिद्ध करण्यात आलेल्या ज्येष्ठतासूचीतील अधिकारी** | | | | |
| ५८. | ५३ | श्री. अजय प्रभाकरराव चरडे | इमाव-दिव्यांग | पदो |

२. उक्त नमूद अधिकाऱ्यांना महाराष्ट्र शासकीय गट अ व गट ब (राजपत्रित व अराजपत्रित) या पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसूली विभाग वाटपाबाबत संदर्भ क्र.६ येथे नमूद करण्यात

आलेल्या अधिसूचना विचारात घेऊन महसूली विभाग वाटपाचे व पदस्थापनेचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

३. उक्त नमूद तहसिलदार संवर्गातील अधिकाऱ्यांना खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून उप जिल्हाधिकारी पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात तदर्थ पदोन्नती देण्यात येत आहे:-

(१) सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भ क्र.५ येथे नमूद करण्यात आलेल्या शासन निर्णयान्वये, मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल असलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या अधीन राहून पदोन्नतीच्या कोट्यातील सर्व रिक्त पदे दि.२५.०५.२००४ रोजीच्या स्थित सेवाज्येष्ठतेनुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात भरण्याबाबत दिलेल्या सूचनांनुसार सदर तदर्थ पदोन्नती देण्यात येत आहे. तसेच, सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भ क्र.५ येथे नमूद करण्यात आलेल्या शासन निर्णयाप्रकरणी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे आव्हान देण्यात आलेले असून त्यावरील अंतिम निर्णयाच्या अधिन राहून सदर तदर्थ पदोन्नती देण्यात येत आहे.

(२) सदर तदर्थ पदोन्नती दिव्यांग कर्मचा-यांना गट-अ व गट-ब मधील पदांवर पदोन्नतीबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दि.२२.०७.२०२१ रोजीच्या निर्णयानुसार दिव्यांग आरक्षणासह पदोन्नतीसाठीची सर्व रिक्त पदे सामान्य प्रशासन विभागाच्या दि.०५.०७.२०२१ रोजीच्या शासन निर्णयातील व दि.२३.०७.२०२१ रोजीच्या शासन पत्रान्वये दिलेल्या सूचनांच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

(३) सरळसेवा कोटयाच्या रिक्त पदांवर व प्रतिनियुक्तीने रिक्त झालेल्या पदांवर देण्यात आलेली तदर्थ पदोन्नती ही ११ महिने किंवा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून उमेदवार उपलब्ध होतील किंवा प्रतिनियुक्तीवरील उमेदवार परत येतील यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत राहील व आवश्यकता असल्यास दर ११ महिन्यानंतर तदर्थ पदोन्नती एक दिवसाकरिता खंडित करुन पुढे चालू ठेवली जाईल. यासाठी तदर्थ पदोन्नती एक दिवसाकरिता खंडित करुन पुढे चालू ठेवण्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात येतील. तथापि, असे आदेश निर्गमित झाले नाही, तरीदेखील दर ११ महिन्यानंतर तदर्थ पदोन्नती एक दिवसाकरिता खंडित करुन पुढे चालू ठेवली गेल्याचे मानन्यात येईल.

दरम्यानच्या काळात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून उमेदवार उपलब्ध झाल्यास किंवा प्रतिनियुक्तीवरील उमेदवार परत आल्यास तदर्थ पदोन्नत झालेल्या अधिका-यांस पदावनत करण्यात येईल. सदर पदोन्नती निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात असून सदर पदावर संबंधित अधिकाऱ्यांचा कायमस्वरूपी धारणाधिकार राहणार नाही.

(४) सरळसेवेच्या कोट्यातील व प्रतिनियुक्तीच्या रिक्त पदांवर दिलेल्या तदर्थ पदोन्नत्या भविष्यात नियमित पदोन्नती कोटयामध्ये पदांच्या उपलब्धतेनुसार समायोजित करून नियमित निवडसूचीस महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची मान्यता मिळण्याच्या अधिन राहून सदर तदर्थ पदोन्नती देण्यात येत आहे.

(५) सदर पदोन्नती निव्वळ तात्पुरत्या स्वरूपाची असल्याने या तात्पुरत्या पदोन्नतीच्या परिणामी पदोन्नती सूचीतील अधिकाऱ्यांना नियमितपणाचा व सेवाज्येष्ठतेचा कोणताही हक्क मिळणार नाही.

(६) शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग, दि.१२.०६.२०१९ अन्वये तहसिलदार संवर्गाची दि.०१.०१.२००४ ते दि.३१.१२.२०१० या कालावधीची अंतिम ज्येष्ठतासूची तसेच शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग, दि.०६.०१.२०२३ अन्वये तहसिलदार संवर्गाची दि.०१.०१.२०११ ते दि.३१.१२.२०१२ या कालावधीची तात्पुरती ज्येष्ठतासूची विचारात घेण्यात आली आहे. निवडसूची तयार करताना कोणीही पात्र ज्येष्ठ अधिकारी वगळण्यात आले नाहीत अथवा अधिक्रमित झालेले नाहीत. त्यामुळे सदर तदर्थ पदोन्नती तहसिलदार संवर्गातील होणाऱ्या नियमितीकरणामुळे, अंतिम ज्येष्ठतासूचीतील होणाऱ्या बदलाच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

(७) सदर तदर्थ पदोन्नती मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे दाखल असलेल्या मूळ अर्ज क्र.३३९/२०२० मधील अवमान याचिका क्र.६९/२०२२ (श्रीमती मनिषा मोहिते वि. महाराष्ट्र शासन व इतर) मध्ये होणा-या अंतिम न्यायनिर्णयाच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

(८) पदोन्नतीच्या अनुषंगाने काही न्यायालयीन प्रकरणे उद्भवल्यास व उप जिल्हाधिकारी संवर्गातील पदोन्नती कोटयात रिक्त पद उपलब्ध नसल्यास या आदेशातील कनिष्ठतम अधिका-याला पदावनत करण्याच्या अधिन राहून सदर तदर्थ पदोन्नती देण्यात येत आहे.

(९) संबंधित अधिका-यांनी पदोन्नती नाकारल्यास शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.३०३/कार्या-१२, दि.१२.०९.२०१६ मधील नमूद तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

(१०) पदस्थापनेनंतर संबंधित अधिकारी पदावर रूजू न झाल्यास, त्यांना पदोन्नतीबाबत स्वारस्य नसल्याचे समजून सामान्य प्रशासन विभागाच्या स्थायी आदेशानुसार निवडसूचीतून त्यांचे नाव वगळण्यात येईल. तद्नंतर कोणत्याही परिस्थितीत त्यांची विनंती मान्य करता येणार नाही.

(११) उप जिल्हाधिकारी पदावरील तदर्थ पदोन्नती ही महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

४. तहसिलदार संवर्गातून उप जिल्हाधिकारी संवर्गात पदोन्नत झालेल्या उपरोक्त अधिकाऱ्यांचे पदस्थापनेबाबतचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित झाल्यानंतर व सदर पदावर रुजू होऊन कार्यभार स्विकारल्यानंतरच उप जिल्हाधिकारी (एस-२०:रू.५६,१००-१,७७,५००) या संवर्गाच्या वेतनाचे लाभ अनुज्ञेय होतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(डॉ. माधव वीर)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

सर्व विभागीय आयुक्त.

**प्रत,**

- मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.

- मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
- मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
- मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे सह सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
- अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
- सर्व जिल्हाधिकारी.
- प्रधान महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखा परीक्षा), मुंबई / नागपूर.
- सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
- सर्व अधिदान व लेखा अधिकारी.
- सर्व आहरण व संवितरण अधिकारी.
- अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई-३२.
- सर्व संबंधित अधिकारी (संबंधित विभागीय आयुक्त यांचेमार्फत).
- अवर सचिव (ई-४)/ कक्ष अधिकारी (ई-१ अ/ ई-३/ई-४ अ), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
- निवडनस्ती (ई-२).